दैनिक

# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com

Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १४६ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


## राजपाल यादवला 2 कोटी भरण्यासाठी दोन आठवड्यांची मुदत

**मुंबई :** बॉलिवूड अभिनेता आणि कॉमेडियन राजपाल यादवला चेक बाऊन्स प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाकडून तात्पुरता दिलासा मिळाला आहे. मंगळवारी झालेल्या सुनावणीदरम्यान राजपाल यादवच्या वतीने उपस्थित वरिष्ठ वकिलांनी न्यायालयाकडे आणखी एक संधी देण्याची विनंती केली. तसेच, अभिनेत्याने किमान २ कोटी रुपये जमा करण्याची तयारी दर्शवत त्यासाठी दोन आठवड्यांचा वेळ मागितला. राजपाल यादवच्या विनंतीनंतर सर्वोच्च न्यायालयाने त्याला अंतिम संधी देत दोन आठवड्यांची मुदत दिली आहे.

## खनिज चोरी रोखण्यासाठी महाराष्ट्रात 'डिजिटल' क्रांती

**मुंबई:** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते खनिजांची चोरी आणि गळती रोखण्यासाठी डिजिटल प्रणालीचे लोकार्पण करण्यात आले आहे. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये खनिजांची चोरी होणाऱ्या प्रकाराला आळा बसणार आहे. गौण खनिजांच्या उत्खनन, वाहतूक, परवाना आणि देखरेख प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता व कार्यक्षमता आणण्यासाठी राज्य सरकारकडून वेबसाईटची सुरूवात केली आहे. महसूल विभागाकडून तयार करण्यात आलेल्या 'महाखनिज २.०' या अत्याधुनिक डिजिटल प्रणालीचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंत्रिमंडळ बैठकीत करण्यात आले.

## थोडक्यात वार्ता

### स्तनदा मातांसाठी राज्यभरातील एसटी बसस्थानकांवर 'हिरकणी कक्ष'

**मुंबई :** महाराष्ट्रातील महिला प्रवाशांसाठी विशेषतः स्तनदा मातांसाठी सुरक्षित, स्वच्छ आणि खासगी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. राज्यातील एसटी बसस्थानकांवर तीन वर्षांत तब्बल १२५ 'हिरकणी कक्ष' (Lactation Pods) उभारण्यात येणार आहेत. यासाठी एसटी महामंडळ आणि टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा करार झाला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक उपस्थित होते. प्रवासादरम्यान स्तनदा मातांना बाळाची निगा राखण्यासाठी योग्य आणि सुरक्षित जागा मिळावी, हा 'हिरकणी कक्ष' उभारण्यामागील प्रमुख उद्देश आहे. या कक्षांमध्ये मातांना स्तनपान तसेच बाळाची देखभाल करण्यासाठी आवश्यक खासगी आणि स्वच्छ जागा उपलब्ध होणार आहे.

### मंत्रिमंडळाचे 7 मोठे निर्णय; शेतकरी, साखर कारखाने अन् नगरपरिषदांना दिलासा

**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. सहकारी साखर कारखान्यांना सॉफ्ट लोन देण्यापासून राज्याच्या प्रमुख धोरणे आणि लोककल्याणकारी योजनांचे मूल्यांकन करण्यासाठी 'महा-टॅक' स्थापन करण्यापर्यंत अनेक प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. याशिवाय शेतकऱ्यांना जमीन परत करणे, शासकीय जमीन विनामूल्य देणे आणि मुद्रांक शुल्क माफ करण्यासह प्रशासकीय निर्णयही घेण्यात आले. २०२५-२६ च्या गाळप हंगामातील थकीत एफआरपी देण्यासाठी आणि आगामी २०२६-२७ च्या गाळप हंगामासाठी सहकारी साखर कारखान्यांना सॉफ्ट लोन उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. या माध्यमातून ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर कारखान्यांना आर्थिक पाठबळ मिळणार आहे. राज्याच्या २५ प्रमुख धोरणे आणि २५ प्रमुख लोककल्याणकारी योजनांचे विश्लेषण व मूल्यांकन करण्यासाठी 'महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष (महा-टॅक)' स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली. IIM मुंबई आणि Centre for Research in Schemes and Policies (CRISP) यांच्या शिफारशीनुसार हे मूल्यांकन केले जाणार आहे. शासनाच्या निर्णय प्रक्रियेत अधिक गुणवत्तापूर्ण सुधारणा करण्यासाठी एक वर्षाच्या महा-टॅक प्रकल्पालाही मंजुरी देण्यात आली.

### मनोज जरांगे यांना रुग्णालयात दाखल होण्याचा सल्ला

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :** मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची आज सकाळी साडेअकराच्या सुमारास जिल्हा वैद्यकीय यंत्रणेकडून तपासणी करण्यात आली. उपोषणामुळे प्रकृती खालावल्याने त्यांना रुग्णालयात दाखल होण्याचा तसेच प्रवास टाळण्याचा सल्ला वैद्यकीय पथकाने दिला होता. मात्र श्री. जरांगे पाटील यांनी रुग्णालयात दाखल होण्यास संमती दिली नाही, अशी माहिती जिल्हा आरोग्य यंत्रणेने दिली. श्री. जरांगे पाटील हे २९ ऑगस्ट २०२६ पासून अंतरवाली सराटी येथे उपोषणास बसले होते. त्यांच्या प्रकृतीच्या निगराणीसाठी चोवीस तास तज्ञ डॉक्टरांचे वैद्यकीय पथक कार्यरत होते. त्यांच्या प्रकृतीची जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या वैद्यकीय पथकाकडून नियमित तपासणी करण्यात येत होती. दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.१० वाजता केलेल्या तपासणीमध्ये श्री. जरांगे पाटील शुद्धीत व प्रतिसाद देण्याच्या स्थितीत होते. तथापि, त्यांना थकवा जाणवत होता व जीभ कोरडी असल्याचे आढळून आले. त्यांनी लघवीचा नमुना दिलेला नाही. तसेच शिरेद्वारे द्रवपदार्थ घेण्यास नकार दिला, अशी माहिती आरोग्य अधिकाऱ्यांनी अहवालाद्वारे दिली.

### "शाल जोडे"




### प्रशासनाचा भोंगळ कारभार आणि बेशरम ठेकेदार


# मिसरवाडीतील जनता तहानलेली अन् लाखो लिटर पाणी वाया!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील प्रशासकीय अनास्थेचा आणि बेजबाबदारपणाचा असाच एक नमुना समोर आला आहे, जिथे सर्वसामान्य जनता पाण्यासाठी वणवण भटकत असताना दुसरीकडे लाखो लिटर शुद्ध पाणी रस्त्यावर सोडून वाया घालवले जात आहे. शहराच्या एका भागात आठ-आठ दिवस नळांना पाण्याचा थेंबही येत नाही, टँकरसाठी रांगा लावाव्या लागतात आणि राजकीय नेते तोंडाला कुलूप लावून बसतात; पण प्रभाग क्रमांक ९ मधील मिसरवाडीत मात्र पाण्याचा महापूर आल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. पाणी टेस्टिंगच्या नावाखाली गेल्या चार दिवसांपासून लाखो लिटर पाणी



सर्रास रस्त्यावर फेकून दिले जात आहे, तरीही महानगरपालिकेचे



**लाखो लिटर पाणी वाया गेले आहे. मिसरवाडीच्या जनतेला टँकर ने पाणीपुरवठा केला जातो ते पाणी आम्हाला विकत घ्यावे लागते परंतु या पाईपलाईनच्या लिकेजमुळे लाखो लेटर पाणी वाया गेलेला आहे. त्याची जबाबदार मनपाने घेऊन दोषी अधिकारी, प्रशासक त्यांच्यावर गुन्हे दाखल करून तात्काळ या पाण्याचा बंदोबस्त करावा. आणि मिसरवाडी च्या जनतेला नळ कनेक्शन द्यावे.**

**- कचरू कांबळे, भाजपा शक्ति केंद्रप्रमुख मिसरवाडी**

झोपलेले अधिकारी आणि या भागातील बेफिकीर नगरसेवक या गंभीर प्रकाराकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करत आहेत.

पाण्याच्या या विनाशाने केवळ पाण्याचा अपव्यय झालेला नाही, तर संपूर्ण रस्त्याची चाळण झाली आहे. रस्त्यावर पाण्याचा लोट वाहिल्यामुळे ठिकठिकाणी जीवघेणे खड्डे पडले आहेत आणि त्यात पडून दररोज वाहनचालकांचे अपघात होत आहेत. संबंधित पाईपलाईन ठेकेदाराने रस्त्याच्या मध्येच खड्डे खणून ठेवले आहेत आणि काम अर्धवट सोडले आहे. या उघड्या खड्ड्यांमुळे आणि रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांच्या जिवाशी खेळ चालला आहे. प्रशासनाच्या डोळ्यांसमोर हा सावळागोंधळ सुरू असतानाही कुणीही जाब विचारत नाही, हे दुर्दैव आहे.

शहरातील तहानलेल्या नागरिकांच्या जखमेवर मीठ चोळणाऱ्या या प्रकाराला जबाबदार कोण? प्रशासनाने तात्काळ या मुजोरी करणाऱ्या ठेकेदारावर आणि दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करत गुन्हे दाखल करायलाच हवेत. केवळ कागदी घोडे नाचवून किंवा ठेकेदाराची पाठराखण करून हा प्रकार खपवून घेतला जाणार नाही. मिसरवाडीतील जनता आता पेटून उठली असून, वेळीच हे वाहणारे पाणी बंद केले नाही आणि दोषींवर कारवाई झाली नाही, तर तीव्र जनक्षोभाचा सामना करावा लागेल..

## मुंबईला आंदोलनासाठी एकटाच जाणार : जरांगे

**जालना :** मुंबईत गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पोलिसांनी दुसऱ्यांदा परवानगी नाकारली आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही जरांगे पाटलांना पुनर्विचार करण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर जरांगे पाटील यांनी मुंबईला आंदोलनासाठी मंगळवारी (ता. १५) एकटाच जाणार असल्याचे जाहीर केले आहे. “मराठा बांधवांनो तुम्ही तयार राहा, योग्य वेळी तुम्हाला बोलावेन,” असे आवाहन त्यांनी केले आहे.

मराठा समाजाच्या आंदोलनात लोकांना घुसवून दंगल घडवण्याचा कट होता असा आरोप जरांगे पाटील यांनी केला. “सरकारने देवदेवतांच्या आडून वार केला आहे. आता आपणही तसाच डाव टाकायचा. मराठ्यांनो तुम्हाला योग्य वेळी मुंबईत बोलावेन. १५ तारखेला मी एकटा जातो. सोबत फक्त २ गाड्या आणि १० लोक असतील.

मी निघालोय आता कसे अडवतो बघू, कोण आझाद मैदानात परवानगी देत नाही बघतो. मराठ्यांची गर्दी होणार म्हणून परवानगी नाकारली आहे. आता मी एकटाच जातो, मंगळवारी सकाळी अंतरवाली सराटीतून मुंबईला जायला निघणार, इतरांनी येऊ नये, फक्त गाड्या तयार ठेवा, योग्य वेळी मी तुम्हाला बोलावेन,” असेही त्यांनी सांगितले.

जरांगे पाटील यांनी सलाईन आणि पाणी बंद केले आहे. उपोषणाचा सतरावा दिवस असून त्यांची प्रकृती बिघडली आहे. सलाईनच्या जीवावर जगतोय आणि त्याच्या जोरावर तुमच्याशी बोलतोय. कधीही काहीही होऊ शकते. आता त्रास जाणवू लागला आहे, असेही त्यांनी सांगितले.

“सरकारने मुंबईत जाण्यासाठी दुसऱ्यांदा परवानगी नाकारली आहे. मरेन, पण मागे हटणार नाही. खितपत पडून मरणार नाही, गुडघे टेकून शरण जाणार नाही. मंगळवार (ता. १५) सकाळी ११ वाजता मुंबईच्या दिशेने निघणार आहे. मुंबईला जाण्याचा शब्द मागे घेतला जाणार नाही. यामुळे समाजाच्या स्वाभिमानाला धक्का लागणार नाही. मराठा बांधवांनी, महिलांनी आणि वृद्धांनी आपल्या गावात, तालुक्यात किंवा शहरात ग्रामपंचायतीसमोर शांततेत फेऱ्या व रॅली काढून या आंदोलनाला पाठिंबा चालू ठेवावा,” असेही ते म्हणाले.

## 'तुमसे ना हो पायेगा' म्हणत शिवसेनेची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

### रखडलेल्या विकासकामांचा जाब विचारत प्रशासनाला निवेदन; कामांना गती न दिल्यास तीव्र जनआंदोलनाचा इशारा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर 'मराठवाड्याचा विकास, तुमसे ना हो पायेगा!' या घोषवाक्याखाली शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने छत्रपती संभाजीनगरातील रखडलेल्या विकासकामांविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. मंगळवारी (दि. १५) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत विविध प्रलंबित प्रकल्पांचा जाब विचारला. याबाबत प्रशासनाला निवेदन देऊन रखडलेल्या कामांना तातडीने गती देण्याची मागणी करण्यात आली.



विविध सरकारांच्या काळात छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या मंत्रिमंडळ बैठकींमध्ये जिल्ह्याच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आल्या. मात्र, घोषणा होऊन अनेक वर्षे उलटली तरी अनेक प्रकल्प अद्याप पूर्णत्वास गेलेले नाहीत. संत ज्ञानेश्वर उद्यान विकास, घृष्णेश्वर मंदिर विकास आराखडा, अमृत-२.० पाणीपुरवठा योजना, मलनिःस्सारण प्रकल्प, विमानतळ विस्तारीकरण, रेल्वे स्थानक पुनर्विकास, मिटमिटा सफारी पार्क, ऐतिहासिक वेस व तटबंदीचे जतन आणि पुणे-छत्रपती संभाजीनगर महामार्ग यांसह विविध प्रकल्पांचा मुद्दा निवेदनातून उपस्थित करण्यात आला.

तसेच छत्रपती संभाजीनगर-पुणे हरितक्षेत्र द्रुतगती महामार्ग, छत्रपती संभाजीनगर-पैठण राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण, अजिंठा घाट चौपदरीकरण व बोगदा प्रकल्प, जायकवाडी कालवा आधुनिकीकरण, भूमिगत मलनिःस्सारण योजना, घाटीतील अतिविशेषोपचार रुग्णालय आणि एयूआरआयसी (शेंद्रा-बिडकीन) औद्योगिक शहराचा विकास या महत्त्वपूर्ण प्रकल्पांच्या प्रगतीकडेही प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले.

'कामांची सद्यस्थिती जनतेसमोर मांडा'

घोषित विकासकामांपैकी किती प्रकल्प पूर्ण झाले, किती सुरू आहेत आणि किती कामे रखडली आहेत, याचा वस्तुस्थितीदर्शक हिशोब जनतेसमोर मांडावा, अशी मागणी शिवसेनेने केली. केवळ घोषणा करून प्रकल्प प्रलंबित ठेवण्याऐवजी त्यांना कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याची मागणीही करण्यात आली.

विकासकामांना तातडीने गती न दिल्यास शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने आणखी तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

यावेळी शिवसेना उपनेते सुभाष पाटील, सहसंपर्कप्रमुख अनिल चोरडिया, जिल्हा संघटक डॉ. शोएब हाश्मी, शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, ज्ञानेश्वर डांगे, दिग्विजय शेरखाने, तालुकाप्रमुख शंकर ठोंबरे, विष्णू जाधव, उपजिल्हाप्रमुख अशोक शिंदे, संतोष जेजुरकर, संतोष खेडके, राजू इंगळे, मनपा गटनेते गणेश लोखंडे, जिल्हा परिषद गटनेते मनोज पेरे, विधानसभाप्रमुख प्रमोद ठेंगडे, विधानसभा संघटक वीरभद्र गादगे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## गणेश महासंघाकडून महापुरुषांच्या स्मारकांची स्वच्छता

### गणेशोत्सवानिमित्त समाजाभिमुख उपक्रम; स्वच्छतेनंतर महापुरुषांना अभिवादन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** गणेशोत्सव केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देत जिल्हा श्री गणेश महासंघ उत्सव समितीच्या वतीने मंगळवारी शहरातील विविध महापुरुषांच्या स्मारकांची स्वच्छता करण्यात आली. स्वच्छतेनंतर महापुरुषांच्या स्मारकांना अभिवादन करून गणेश भक्तांना समाजाभिमुख उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराज पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा श्री गणेश महासंघ उत्सव समितीचे अध्यक्ष हरिभाऊ हिवाळे यांच्या नेतृत्वाखाली



क्रांती चौक येथून अभियानाला सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून स्वच्छता मोहिमेस प्रारंभ करण्यात आला.

यानंतर पैठण गेट येथील लोकमान्य टिळक व स्वातंत्र्यसेनानी गोविंदभाई श्रॉफ, संभाजीपेठ येथील क्रांतिसूर्य महात्मा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, मिल कॉर्नर येथील छत्रपती राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठासमोरील नामांतर लढ्यातील शहीद स्तंभ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक आणि महर्षी दयानंद चौक येथील शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकांची साफसफाई करण्यात आली. त्यानंतर संबंधित महापुरुषांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी सुरेश वाकडे, डॉ. बाळासाहेब थोरात, राजू बागडे, अभिषेक देशमुख, दिनेश राजेभोसले, राजेश मेहता, संदीप शेळके, विशाल दाभाडे, नागेश फुले, विशाल जाधव, आयुष थोरात आणि प्रसिद्धीप्रमुख सचिन अंभोरे यांची उपस्थिती होती. अभियानासाठी महापालिका अग्निशमन विभागाचे वाहनचालक सतीश शेळके, फायरमन उमेश भोसले, मनसुबराव सपकाळ आणि प्रसाद शिंदे यांनी सहकार्य केले.

## दालन नाही मिळाले, वंचितची गांधीगिरी; प्रभाग सभापतींचे चक्क पार्किंगमध्येच चालवले कामकाज!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

महानगरपालिकेच्या कारभारातील अनास्था आणि अधिकारांची पायमल्ली कशी होते, याचे उत्तम उदाहरण नुकतेच पाहायला मिळाले. प्रभाग क्रमांक १ च्या प्रभाग सभापती करुणा जाधव यांना प्रशासनाकडून कार्यालयीन कामकाजासाठी अधिकृत दालन उपलब्ध करून देण्यात आले नव्हते. यामुळे संतप्त झालेल्या सभापती करुणा जाधव यांनी प्रशासनाच्या या भूमिकेविरोधात अनोखे आंदोलन करत मुख्यालयातील परिसरातच थेट वाहनांच्या पार्किंगमध्ये झाडाखाली बसून गांधीगिरी मार्गाने बैठक घेतली. सभापतींना कामकाजासाठी तातडीने दालन उपलब्ध करून द्यावे, या मागणीसाठी त्यांनी पार्किंगमध्येच आपला ठिय्या मांडला.

या अनोख्या आणि लक्षवेधी आंदोलनाची तीव्र दखल घेत




अखेर प्रशासनाला आपली भूमिका बदलावी लागली असून, करुणा जाधव यांना तातडीने दालन देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. लोकप्रतिनिधींच्या अधिकारांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनाला या गांधीगिरी आंदोलनामुळे अखेर गुडघे टेकवावे लागल्याची चर्चा महापालिका वर्तुळात रंगली आहे.

# देवगिरी बँकेला राज्यातील 'सर्वोत्कृष्ट बँके'चा मान

## महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशनच्या पुरस्कारात आपल्या गटात प्रथम क्रमांक

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** ग्राहकांचा विश्वास, आधुनिक बँकिंग सुविधा आणि सातत्यपूर्ण प्रगतीच्या बळावर देवगिरी नागरी सहकारी बँक लि., छत्रपती संभाजीनगरने राज्यातील 'सर्वोत्कृष्ट बँक' पुरस्कारावर आपले नाव कोरले आहे. महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशनतर्फे सन २०२५-२६ साठी देण्यात आलेल्या या पुरस्कारात एक हजार एक कोटींपेक्षा अधिक ते अडीच हजार कोटी रुपयांपर्यंत ठेवी असलेल्या नागरी सहकारी बँकांच्या गटातून देवगिरी बँकेने प्रथम क्रमांक मिळविला.




सहकारी बँकिंग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नागरी सहकारी बँकांच्या कार्याची दखल घेऊन फेडरेशनतर्फे दरवर्षी 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार' दिला जातो. यंदा देवगिरी बँकेने आपल्या गटात अव्वल कामगिरी करत हा प्रतिष्ठेचा पुरस्कार पटकावला.

पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, दि. १२ सप्टेंबर रोजी एक्सप्रेस इन हेरिटेज, जालना रोड, सुंदरवाडी येथे झाला. देवगिरी बँकेच्या वतीने संचालक सजनराव मते (नाना), राजेश जैन, नागनाथ काजळे, सुरेश जगाडे, डॉ. प्रज्ञा तल्हार, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे यांनी पुरस्कार स्वीकारला.

या यशाबद्दल बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांनी आनंद व्यक्त केला. ते म्हणाले, “सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कारासाठी देवगिरी बँकेची निवड होणे ही आनंदाची बाब आहे. हा सन्मान कोण्या एका व्यक्तीचा नसून बँकेशी जोडलेल्या प्रत्येकाचा आहे. सभासद व ग्राहकांनी दाखविलेला विश्वास आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांनी केलेले प्रामाणिक प्रयत्न यामुळेच ही वाटचाल शक्य झाली.”

देवगिरी बँकेने ग्राहकाभिमुख सेवा, आधुनिक बँकिंग सुविधा आणि सातत्यपूर्ण प्रगतीच्या माध्यमातून सहकारी बँकिंग क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. या कामगिरीची दखल घेत मिळालेला पुरस्कार हा संचालक मंडळाचे मार्गदर्शन, व्यवस्थापनाचे नियोजन, अधिकारी-कर्मचाऱ्यांचे परिश्रम तसेच सभासद आणि ग्राहकांच्या विश्वासाची पावती असल्याची भावना बँकेकडून व्यक्त करण्यात आली.

# संपादकीय

## राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयांचे दूरगामी परिणाम

महाराष्ट्र शासनाच्या राज्य मंत्रिमंडळाच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत राज्याच्या सर्वसमावेशक विकासाला गती देणारे अनेक महत्त्वपूर्ण आणि धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहेत. एकाच बैठकीत कृषी क्षेत्र, सहकार, प्रशासकीय सुधारणा, नगरविकास आणि सामाजिक संस्थांशी संबंधित घेतलेले हे निर्णय राज्याच्या आगामी विकासाची दिशा ठरवणारे ठरतील यात शंका नाही. पारदर्शक कारभार, धोरणांची प्रभावी अंमलबजावणी आणि तळागाळातील घटकांना न्याय देण्याची भूमिका या निर्णयांच्या माध्यमातून पुन्हा एकदा स्पष्ट झाली आहे. या निर्णयांमध्ये प्रामुख्याने साखर उद्योग आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रश्नांना प्राधान्य देण्यात आले आहे. २०२५-२६ च्या गाळप हंगामातील थकीत एफआरपी आणि आगामी २०२६-२७ च्या हंगामासाठी सहकारी साखर कारखान्यांना सॉफ्ट लोन उपलब्ध करून देण्याचा निर्णय अत्यंत काळाची गरज होता. यामुळे साखर कारखानदार आणि शेतकरी वर्गावरील आर्थिक ताण हलका होण्यास मदत होईल. तसेच, राज्याच्या २५ प्रमुख धोरणांचे आणि लोककल्याणकारी योजनांचे मूल्यमापन करण्यासाठी 'महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष (महा-टॅक)' ची स्थापना करण्याचा निर्णय अत्यंत नाविन्यपूर्ण आहे. आयआयएम मुंबई आणि 'क्रिसप'च्या शिफारसीनुसार होणारे हे वैज्ञानिक मूल्यांकन शासकीय योजनांच्या गुणवत्तेत आणि पारदर्शकतेत मोठी वाढ घडवून आणेल. यासोबतच सामाजिक, शैक्षणिक आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासालाही या बैठकीत बळकटी देण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील हरेगाव येथील शेती महामंडळाच्या ताब्यातील जमिनी कायद्यात सुधारणा करून मूळ मालक शेतकऱ्यांना परत करण्याचा घेतलेला निर्णय ऐतिहासिक व न्याय्य आहे, ज्यामुळे वर्षानुवर्षे प्रतीक्षा करणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. याशिवाय, नाशिक साहित्य परिषदेच्या वाचनालयाचे मुद्रांक शुल्क माफ करणे, आर्वी नगरपरिषदेला व्यापारी संकुलासाठी विनामूल्य जमीन देणे आणि मुंबई पोलीस हाऊसिंग प्रकल्पासाठी प्रशासकीय बळकटीकरण करणे यांसारखे निर्णय जनहिताचासाटी अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. हे सर्व निर्णय राज्याला प्रगतीच्या मार्गावर वेगाने नेणारे आणि प्रशासकीय निर्णय प्रक्रियेला अधिक लोकाभिमुख करणारे ठरतील.

## सणासुदीत काळात महागाईचा उडाला भडका

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी.

**परभणी :**-ऐन सणासुदीत महागाईचा आणखी भडका उडाला आहे. केंद्र सरकारने सोमवारी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार. घाऊक किंमत निर्देशांकावर(डब्ल्यूपीआय). आधारित महागाईचा दर ऑगस्ट 2026 मध्ये.9.92%. टक्क्यांवर पोहोचला. जुलैमध्ये घाऊक महागाई दर.9.78%. टक्के होता. खाद्यपदार्थांच्या किमतीही ऑगस्टमध्ये वाढून ही महागाई महिनाभरात.6.65%. टक्क्यांवरून.7.05. टक्क्यांवर वाढली वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानुसार ऑगस्टमध्ये सर्व वस्तूंचा घाऊक किंमत निर्देशांक.110.8. राहिला जुलैमध्ये तो.110.0 होता. अलीकडच्या काळात आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत झालेल्या वाढीचा परिणाम इंधन आणि ऊर्जा क्षेत्रातील महागाईवर स्पष्टपणे दिसून येतो आहे. ऑगस्टमध्ये इंधन आणि ऊर्जा क्षेत्रातील महागाई मोठ्या प्रमाणात वाढून.22.93%. टक्क्यांवर पोहोचली जुलैमध्ये हा.दर.20.05% होता प्राथमिक वस्तूंच्या महागाईत मात्र अल्प घट झाली आहे.

ऑगस्टमध्ये प्राथमिक वस्तूंची महागाई.7.76%. टक्के राहिली तर जुलैमध्ये ती.8.52% होती दुसरीकडे उत्पादित वस्तूंची महागाई किंचित वाढवून.8.37%. टक्क्यांवर पोहोचली. जुलैमध्ये हा.दर.8.29%. होता. ऑगस्टमध्ये प्राथमिक वस्तूंचा निर्देशांक.118.1. इंधन आणि ऊर्जेचा निर्देशांक.108.3. तर उत्पादित वस्तूंचा निर्देशांक.108.8. राहिला. जुलैमध्ये हे निर्देशांक अनुक्रमे.117.2.105.4. आणि.108.4 होते. खाद्यपदार्थाच्या किमतीवरील दबावही वाढला आहे. त्यामुळे सणासुदीच्या काळात खाद्यपदार्थांच्या किमतीवरील दबाव कायम राहण्याचे संकेत आहे.

मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार ऑगस्ट मधील घाऊक महागाई वाढविणाऱ्या प्रमुख घटकांमध्ये खनिज तेल आणि पेट्रोलियम उत्पादने. खाद्यपदार्थ. खाद्यपदार्थांचे उत्पादन मूलभूत धातू .बिगर खाद्य वस्तू. तसेच रसायने आणि रासायनिक उत्पादनांच्या निर्मितीचा समावेश आहे. दरम्यान सरकारने जून 2026 च्या घाऊक महागाईच्या अंतिम आकडेवारीत काहीशी दुरुस्ती केली आहे. जूनचा घाऊक किंमत निर्देशांक.110.2. या तात्पुरत्या अंदाजावरून सुधारित करून.110.3 करण्यात आला आहे. त्याचबरोबर जून 2026 मधील घाऊक महागाईचा अंतिम दर.9.87%. टक्क्यांवरून सुधारित करून.9.97% टक्के करण्यात आला आहे. उत्पादन क्षेत्रासाठी इनपुट उत्पादक किंमत निर्देशांक पी पी आय ऑगस्ट 2026 मध्ये 104.2 राहिला. जून महिन्याचा चाचणी बीपी आहे 105.9 करण्यात आला आला किरकोळ महागाई पोहोचली.4.82. टक्क्यांवर. कांदा आणि इतर खाद्यपदार्थांच्या किमती वाढल्याने ऑगस्ट मध्ये किरकोळ महागाई वाढवून 4.2% वर पोहोचली रिझर्व बँकेच्या मध्यम लक्ष्यापेक्षा ती अद्याप अधिक आहे. अशी माहिती सोमवारी जाहीर झालेल्या सरकारी आककडे वारीतून समोर आली. घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाईही ऑगस्टमध्ये वाढून. 9.92 टक्क्यांवर पोहोचली. जुलैमध्ये ती.9.78%. टक्के होती. ग्राहक किंमत निर्देशांकावर सीपीआर आधारित किरकोळ महागाई जुलैमध्ये 4.45% टक्के होती. जानेवारीपासून 2024 हे आधार वर्ष असलेली नवी मालिका लागू झाल्यानंतर ऑगस्ट मधील किरकोळ महागाईचा दर हा सर्वाधिक आहे. किरकोळ महागाईचा वाढलेला दर हा रिझर्व बँकेच्या चलनविषयक धोरण समितीची (एमपीसी) पुढील महिन्याच्या सुरुवातीला होणाऱ्या बैठकीत धोरणात्मक व्याजदर निश्चित करण्यासाठी महत्त्वाचा घटक ठरणार आहे. ऑगस्टमध्ये कांद्याच्या किमतीतील महागाई वाढवून 48.27% टक्क्यांवर पोहोचली. जुलैमध्ये हा.दर 22.54% टक्के.होता

# टिळकांनी गणपतीला रस्त्यावर का आणले.?

भारत आणि भारतीय संस्कृती ही अतिशय प्राचीन पुरातन आहे. अध्यात्म हा भारताचा आत्मा आहे, अध्यात्म सोडून भारत हा कधीही एकसंघ राहू शकत नाही हे वास्तव आहे. रामायण कालीन, महाभारत कालीन, वेदकालीन, उपनिषदकालीन सर्व ग्रंथांतून भारताचे अध्यात्म प्रगट होतं हे निर्विवाद सत्य आहे. श्रीमद आद्यशंकराचार्य, संत ज्ञानेश्वर संत तुकारामादी संत, स्वामी विवेकानंद, योगी अरविंद, स्वातंत्र्यवीर सावरकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे गोळवलकर ह्या सर्वांनी भारताचा आत्मा हा आध्यात्म आहे हेच सांगितल आणि ते तसे स्वतः जगले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी सुद्धा ग्रामगीतेच्या माध्यमातून अध्यात्मच मांडल. स्वातंत्र्यपूर्व काळ असेल किंवा स्वातंत्र्योत्तर काळ असेल, दोन्ही काळामध्ये अध्यात्माची कास ही भारतीय तरुणांनीच घेतलेली आहे भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात तरुण हाच स्वातंत्र्याचा केंद्रबिंदू होता. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील विज्ञाननिष्ठ बौद्ध धम्म स्वीकारला पण या बौद्ध धम्माला सुद्धा आध्यात्मिक कास होतीच, आहेच हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. भारताच्या प्रमुख सहा उपासना पद्धतीमध्ये जैन, नानक, बौद्ध, क्षैव, शाक्त, आणि वैष्णव या सर्व उपासना पद्धती या अध्यात्मिक बाबींशी जोडलेल्या आहेत हे लक्षात घेतलं पाहिजे. या देशाचा इतिहास तरुणांनीच बदलला. या देशाचा भूगोल तरुणांनीच बदलला. या देशातले बदल तरूनच करतील, या देशामध्ये क्रांती तरुणांनीच आणली होती. तरुणांची दिशा बदलली की राष्ट्राची दिशा बदलते. तरुणांची दिशा योग्य असली की राष्ट्र वैभव संपन्नतेकडे जातं. हाही या देशाचा दैदिप्यमान इतिहास आहे. तरुणांची हीच शक्ती लोकमान्य टिळकांनी १६ सप्टेंबर १८८३ ला ओळखली आणि म्हणून या देशातील तरुणांनी एकत्र यावं, ब्रिटिशांच्या विरोधात त्या तरुणांची शक्ती एकत्रित करावी त्या तरुणांना दिशा देता यावी, तरुणींनी जाती पंथ सोडून एकत्र यावं, तरुणांच्या दिशेने राष्ट्राची उन्नती साधावी अशा उदात्त हेतूने लोकमान्य टिळकांनी देवघरातील गणपती हा रस्त्यावर आणला आणि इतिहास घडला. ब्रिटिशांनी भारतीयांना एकत्र येऊ नये म्हणून अतिशय कुटिल कारस्थान केले होते, लोकमान्य टिळकांनी या सर्वांना अध्यात्माच्या माध्यमातून गणेशोत्सव याद्वारे एकत्रीकरण करण्याचा अभूतपूर्व निर्णय घेतला आणि तो आज पर्यंत ऐतिहासिक, दूरदर्शी, दीर्घदर्शी, आदर्श, प्रभावी ठरलेला आहे. जेन झी, जेन अल्फा ह्यांना योग्य दिशा द्यावी लागते हे टिळकांनी साधारणपणे दीडशे वर्ष अगोदर सांगितल आहे. एक प्रश्न मात्र नेहमी पडतो लोकमान्य टिळकांनी ज्या हेतूने देवघरातला गणपती रस्त्यावर आणला त्याच्या मागची भूमिका आणि त्यामागचा हेतू हा तोपर्यंत सिद्ध होता. आज आपण त्या विषयाचा दुरुपयोग करतो की सदुपयोग करतो यावर चिंतन होणं अत्यंत गरजेचं आहे. असं नाहीये की आजही याचा उपयोग नाही. या देशाला विशेषतः महाराष्ट्र राज्याला अनेक मोठे नेते हे गणेश मंडळाच्या माध्यमातून मिळालेले आहेत. महाराष्ट्राची अनेक राजकीय घराणी ही गणेश मंडळातूनच पुढे आलेली आहेत. मुंबई पुणेच नाही तर ग्रामीण भागात देखील अनेक तरुण नेते सुद्धा गणेश मंडळातूनच पुढे येतात. परंतु ज्या गणेश मंडळांची दिशा भरकटलेली आहे त्यांच्यावर चिंतन कोणी करायचं.?

गणेश मंडळांची उपयोगिता ही आजही तितकीच आहे, किंबहुना त्यापेक्षा जास्त आहे. गणेश मंडळातील तरुण शक्ती ही समाजाच्या उपयोगाची आजही आहे. गणेश मंडळातून पुढे येणारा तरुण अध्यात्मिक असतो, बौद्धिक संपन्न असतो, कार्यक्षम असतो, विद्वान असतो, समरसतीची जाण असते, योग्य दिशा त्याची असते. परंतु आज आपल्या अवती भवती काय स्थिती आहे ह्याचा विचार केला पाहिजे. मी सर्वांना दोष देत नाही. अस्तित्वात ह्यांचं प्रमाण नगण्य असेल पण तरीही बदल केला पाहिजे. आज अनेक गणेश मंडळ पत्ते खेळायची जागा झालेली आहे. आणि गणेश मंडळ यातून एक विचित्र व्यवस्था निर्माण होत आहे. गणेश मंडळांचा हेतू हा समाजाला योग्य दिशा आणि समाजाचं काम करण्याच्या हेतूने झालेला असतो. परंतु आज काही गणेश मंडळ फक्त नाचायसाठी यापुढे आलेली आहेत. डॉल्बीचा प्रचंड मोठा आवाज, आजूबाजूला राहणाऱ्या म्हाताऱ्या, हृदयाच्या रुग्णांना, बालांना, वृद्धांना त्याचा त्रास होतो याची यत्किंचितही कल्पना आजच्या काही गणेश मंडळातील तरुणांना राहिलेली नाहीये हे दुर्दैव आहे, पण सत्य आहे. मंडळातील जबाबदार तरुणाच्या भाषेचा स्तर प्रचंड घसरलेला दिसतो आहे. त्यातही बदल होन गरजेचं आहे. मनोरंजन करावं त्याला कोणाचा विरोध असण्याचे काहीही कारण नाही, पण आपल्या मनोरंजनाचा समाजाचा त्रास होऊ नये ह्याची काळजी देखील घेतली पाहिजे. कारण आपण मंडळ आहोत मंडळ म्हणजे "सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यासाठी पुढे आलेला समूह" ह्याला सार्वजनिक मंडळ म्हणलं आहे. आपले गणेश मंडळ, आपले दुर्गा मंडळ, आपली समिती त्या दिशेने जाते का ह्याचा विचार केला पाहिजे की नाही. आपण तरुण आहोत आणि म्हणूनच समाजाला आपल्याकडून जास्त अपेक्षा आहेत. समाज आपल्याला देशाचा कणा समजतो तर आपलं ही काम आहे ह्या समाजाला आपल्या कामाचा उपयोग व्हावा. आपले मंडळ त्याला योग्य न्याय द्यायचं काम करत का.? ह्याचा विचार देखील आपण मंडळाने केला पाहिजे.

गणेश मंडळाच्या माध्यमातून, आरोग्यसेवा, रुग्णसेवा, नैसर्गिक उपचार पद्धती, पर्यावरण पूरक गणेश मंडळ, समरसतेतून साकारणारा समाज आणि त्याला आकार देणार गणेश मंडळ, पर्यावरण संरक्षण, कुटुंब प्रबोधन, नागरी कर्तव्य, ह्याचे भान ठेऊन आजही अनेक मंडळ आपले कार्य समाजाच्या हिताचे करत असतात. गणेश मंडळाने जे ठरवलं ते ते होत कारण ती संघटित युवा शक्ती असते. संघटित युवाशक्ती हीच खरी बदल करणारी शक्ती असते. गणपती केवळ बुद्धीची देवता नाही, गणपती सेवेची देवता आहे, गणपती ही पर्यावरणाची देवता आहे, गणपती प्राणिमात्रांवर दया करणाऱ्यांची देवता आहे, गणपती हा आरोग्याचा समतोल राखता यावा अशी आदर्श देवता आहे, गणपती ही कुटुंब व्यवस्थेचं प्रतीक आहे, गणपती हे कार्याची देवता आहे, कर्तव्याची देवता आहे. लोकमान्य टिळकांनी ज्या हेतूने गणपतीला रस्त्यावर आणलं तो निखळ सामाजिक हेतू होता. नाहीतर सोवळ्यात असलेला गणपती आजही प्रत्येकाच्या घरात आहेच की. पण टिळकांना हा गणपती अपेक्षित नव्हता. आज टिळक जरी ह्यात नसले आणि भारत स्वातंत्र्य जरी असला तरी मात्र गणेश मंडळाची आवश्यकता आजही आहे, कारण त्यातून समाजाचा उद्धार होणार आहे. सामाजिक सुधारणा, पर्यावरण सुधारणा, आपल्या नागरी कर्तव्यांची जाणीव ह्याचा विचार करता आजही गणेश मंडळ त्या विषयासाठी पूरक ठरतील असा मला आजही विश्वास आहे. टिळकांनी दिलेला रस्ता आणि त्याला आजच्या सामाजिक विषयाची सांगड घातली की आजही ह्याची उपयोगिता आपल्या सर्वांच्या लक्षात येते. लोकमान्य टिळकांनी ज्या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला, तोच वारसा आजही ही मंडळे पुढे चालवतात. रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी, शैक्षणिक मदत आणि आपत्ती व्यवस्थापन यांसारखे सामाजिक उपक्रम मंडळे राबवतात. युवा पिढीला, तरुणांना एकत्र आणून त्यांना सकारात्मक व सांस्कृतिक कामांशी जोडण्याचे काम गणेश मंडळे करतात. यामुळे तरुणाईची ऊर्जा योग्य मार्गाला लागते. सांस्कृतिक पारंपारिक ढोल-ताशा पथके, लेझीम, लोककला, आणि धार्मिक परंपरेचे जतन मंडळांच्या माध्यमातून होते. शासनानेही आता गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केले असून, या मंडळांच्या कार्याला आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सामाजिक ऐक्य वेगवेगळ्या जाती, धर्म आणि स्तरातील लोकांना एकत्र आणून सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्यास हा उत्सव मदत करतो. आजची अनेक मंडळे शाडूच्या मातीच्या मूर्ती, नैसर्गिक सजावट आणि कृत्रिम तलावांचा वापर करण्याबाबत समाजात जनजागृती करत आहेत. अपवादात्मक गणेश मंडळांनी आपली स्थिती सुधारली तर आजही हा मोहत्सव जागतिक कीर्तीचा ठरेल आणि समाज आणि राष्ट्र त्यातून पुढे जाईल असा विश्वास आहे...

**- विशाल वसंतराव मुळे आजेगावकर.**

### 132 वर्षांची गौरवशाली परंपरा! निजामकालापासून सुरू आहे श्री चिंतामणी महादेव मंदिर गणेश मंडळाचा गणेशोत्सव

## स्वातंत्र्य, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक प्रबोधनाचा संदेश देणाऱ्या ऐतिहासिक परंपरेचा जागर

सार्वजनिक गणेशोत्सवाचा प्रारंभ पुण्यात १८९२ च्या आसपास भाऊ रंगारी व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुढाकारातून झाला. त्यानंतर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी १८९३ पासून या उत्सवाला व्यापक सार्वजनिक आणि राष्ट्रजागृतीचे स्वरूप दिले. गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजसंघटन, राष्ट्रीय एकात्मता आणि स्वातंत्र्याची भावना जनमानसात रुजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य झाले.

त्या काळात मराठवाडा हा हैदराबाद संस्थानाचा, अर्थात निजामाच्या राजवटीचा भाग होता. निजामाच्या काळात सामाजिक व धार्मिक कार्यक्रम तसेच मोठ्या जमावांवर प्रशासनाचे नियंत्रण होते. त्यामुळे सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करणे आव्हानात्मक होते. अशा प्रतिकूल परिस्थितीतही गणेश मंडळांनी धार्मिक उत्सवाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन, राष्ट्रीय एकात्मता आणि स्वातंत्र्याचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले.

सन १८९४ मध्ये मराठवाड्यातील पहिला सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी चिंतामणी महादेव मंदिर येथे तत्कालीन स्वातंत्र्यसैनिकांनी एकत्र येऊन श्री चिंतामणी महादेव मंदिर गणेश मंडळाची स्थापना केली. या ऐतिहासिक परंपरेला यंदा १३२ वर्षे पूर्ण होत आहेत.

या मंडळाचा उद्देश केवळ धार्मिक उत्सव साजरा करणे एवढाच मर्यादित राहिला नाही. लोकजागृती, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक प्रबोधन आणि राष्ट्रविचारांचा प्रसार हे मंडळाच्या कार्याचे प्रमुख आधारस्तंभ राहिले आहेत. व्याख्याने, मेळे, पोवाडे, कीर्तन तसेच विविध सामाजिक व राष्ट्रीय विषयांवरील कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजप्रबोधनाची परंपरा मंडळाने सातत्याने जपली आहे.

**निजामशाहीच्या काळात गणेशोत्सव ठरला जनजागृतीचे प्रभावी माध्यम**

निजामाच्या राजवटीत थेट राजकीय विरोध करणे कठीण होते. त्यामुळे गणेशोत्सवाच्या माध्यमातून प्रतीकात्मक स्वरूपात स्वातंत्र्य, स्वराज्य आणि राष्ट्रभावनेचे विचार जनतेपर्यंत पोहोचविले जात. धार्मिक उत्सवाच्या माध्यमातून लोकांना एकत्र आणून सामाजिक प्रश्नांवर चर्चा, व्याख्याने, पोवाडे आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जात.

यामुळे गणेशोत्सव हा केवळ धार्मिक सोहळा न राहता सामाजिक जागृती, राष्ट्रभक्ती आणि जनसंघटनाचे प्रभावी व्यासपीठ ठरला.

**हैदराबाद मुक्तिसंग्रामात संस्थापक सदस्यांचे योगदान**

मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या काळात श्री चिंतामणी गणेश मंडळाच्या संस्थापक सदस्य ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिकांचे मोलाचे योगदान राहिले. सन १९४८ मध्ये हैदराबाद संस्थान निजामाच्या राजवटीतून



मुक्त झाले. त्यानंतर मराठवाड्यातील गणेशोत्सवाला अधिक मुक्त वातावरण मिळाले आणि विविध सामाजिक, सांस्कृतिक व राष्ट्रजागृतीपर कार्यक्रमांना मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली.

श्री चिंतामणी महादेव मंदिर गणेश मंडळाने आपल्या प्रदीर्घ वाटचालीत जिंतूर शहरातील सांस्कृतिक जीवन समृद्ध केले आहे. मंडळाच्या विविध कार्यक्रमांना बालगंधर्व, 'कान्होपात्रा' या सांस्कृतिक परंपरेशी संबंधित कलावंतांसह प्रख्यात गायिका हिराबाई बडोदेकर, पंडित जसराज, प्रभा अत्रे, प्रसाद सावकार तसेच विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली आहे.

नजीकच्या काळात पद्मश्री दादा लाड, प्रसिद्ध अभिनेते योगेश सोमण, पूजनीय माधवानंद महाराज, ह.भ.प. दस्तापूरकर महाराज, ह भ प गोसावी महाराज त्र्यंबकेश्वर, मा. योगेश साळेगावकर यांसह आध्यात्मिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी मंडळास भेट देऊन विविध कार्यक्रमांत सहभाग नोंदविला आहे.

**सामाजिक उपक्रमांचीही प्रदीर्घ परंपरा**

गणेशोत्सवाच्या माध्यमातून मंडळाने धार्मिक कार्याबरोबरच सामाजिक बांधिलकीही जपली आहे. वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, एकांकिका, भागवत सप्ताह, व्याख्याने, कीर्तन, भजन, भारुड आदी विविध उपक्रमांचे आयोजन करून मंडळाने आदर्श गणेशोत्सवाची परंपरा निर्माण केली आहे.

या ऐतिहासिक परंपरेचा वारसा पुढे नेत यंदाही मंडळाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हैदराबाद मुक्तिसंग्राम आणि राष्ट्रीय विचार या विषयावर विशेष कार्यक्रम घेण्यात येणार असून श्री सतीश सातोनकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. तसेच 'तेजोमय आनंद नादब्रह्म' या संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रहिताच्या संकल्पनेला अधोरेखित करण्यासाठी श्री गणेश यागाचेही आयोजन करण्यात आले आहे.

**गणेश मिरवणुकीतून सामाजिक संदेश**

गणेशोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक श्रद्धेबरोबरच राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा, व्यसनमुक्ती, सांस्कृतिक जतन आणि समाजप्रबोधनाचा संदेश देण्याचा मंडळाचा प्रयत्न आहे. भजने, भारुडे, वारकरी परंपरा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबरच मिरवणुकीतूनही सामाजिक संदेश देण्याची परंपरा मंडळाने जपली आहे.

गेल्या काही वर्षांपासून जालना येथील आनंदी स्वामी ढोल-ताशा पथक गणेश विसर्जन मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण ठरत आहे.

१३२ वर्षांच्या या ऐतिहासिक आणि गौरवशाली परंपरेचा वारसा जपत यंदाचा गणेशोत्सवही भक्ती, संस्कृती, राष्ट्रभावना आणि सामाजिक प्रबोधनाचा संगम ठरावा, यासाठी मंडळाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन श्री चिंतामणी महादेव मंदिर गणेश मंडळाचे श्री योगेश काशीकर(नगरसेवक), शैलेश कोठेकर, श्रीकांत टाकळकर, सागर जोशी, अविनाश जोशी, रोहीत जोशी, दिलीप काळे, राघव इटोलीकर, तेजस कडे यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# 31 ऑक्टोबरपर्यंत सर्व पात्र बालकांची आरोग्य तपासणी करा

## आरबीएसके पथकांना आयुक्त संजय काटकर यांचे निर्देश; क्षेत्रीय आरोग्य सेवेत प्रभावी कामकाजावर भर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत (आरबीएसके) अंगणवाडी, जिल्हा परिषद शाळा आणि आश्रमशाळांमधील सर्व पात्र बालकांची आरोग्य तपासणी ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत १०० टक्के पूर्ण करा, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य विभागाचे आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे अभियान संचालक संजय श्रीपतराव काटकर यांनी दिले. छत्रपती संभाजीनगर जिल्हा रुग्णालयात छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यांतील आरोग्य सेवांचा आढावा घेताना त्यांनी हे निर्देश दिले.



आरबीएसके तपासणीदरम्यान आजार, जन्मजात दोष, विकासात्मक विलंब अथवा अन्य आरोग्य समस्या आढळलेल्या बालकांना आवश्यक उपचार व संदर्भ सेवा तातडीने उपलब्ध करून द्यावी. संदर्भित बालकांच्या उपचाराचा नियमित पाठपुरावा करून उपचार पूर्ण होण्यासाठी विशेष लक्ष द्यावे, अशी सूचनाही काटकर यांनी केली. प्रत्येक पात्र बालकापर्यंत सेवा पोहोचण्यासाठी आरबीएसके पथकांनी शाळा व अंगणवाड्यांचा आगाऊ दौरा कार्यक्रम तयार करून नियोजनबद्ध पद्धतीने तपासण्या कराव्यात, असे त्यांनी सांगितले.

बैठकीत औषधांचा साठा व उपलब्धता, ऑक्सिजन व्यवस्था, फायर सेफ्टी, संदर्भ सेवा, उपचार व्यवस्था तसेच आरोग्य संस्थांच्या गुणवत्ता मानांकनाचा आढावा घेण्यात आला. ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयांना नियमित भेटी देऊन औषधसाठा, ऑक्सिजन, फायर सेफ्टी आणि रुग्णालयीन व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी करण्याच्या सूचना जिल्हा शल्य चिकित्सकांना देण्यात आल्या. तसेच NQAS व इतर गुणवत्ता मानांकनासाठी आवश्यक सुधारणा तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

जिल्ह्यात बोगस वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती आढळल्यास त्यांच्याविरुद्ध तातडीने कायदेशीर कारवाई करून गुन्हे दाखल करावेत, असेही काटकर यांनी स्पष्ट केले. आरबीएसके अंतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी खाजगी वैद्यकीय व्यवसाय करीत असल्याचे आढळल्यास नियमानुसार कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

रुग्णांना वेळेत, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण सेवा मिळणे आवश्यक आहे. शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी क्षेत्रीय पातळीवरील कामकाज अधिक प्रभावी करावे. उपलब्ध मनुष्यबळ, औषधे, उपकरणे आणि पायाभूत सुविधांचा योग्य वापर करून आरोग्य सेवा सक्षम करावी, असे आवाहन काटकर यांनी केले.

बैठकीस आरोग्य उपसंचालक डॉ. कांचन वानेरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पद्मजा अजय सराफ यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



जेष्ठ गायक तथा सामाजिक कार्यकर्ते श्री जगदीशबुवा काशिनाथ भोईर,जयगणेश वसाहत मु. नागाव उरण रायगड यांच्या निवास स्थानी विराजमान झालेली गणेश मूर्ती.

## श्री माऊली प्रतिष्ठा गणेश मंडळाची गणरायाची प्राणप्रतिष्ठा उत्साहात



**बिडकीन, दि. १५ सप्टेंबर :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील नवीन गावठाण, बालाजीनगर परिसरातील श्री माऊली प्रतिष्ठा गणेश मंडळाच्या गणरायाचे नवव्या वर्षात उत्साहात आगमन झाले. यानिमित्त गणरायाच्या मूर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठा व महाआरती करण्यात आली.

पत्रकार अरुण देविदास व अनिता अरुण देविदास यांच्या हस्ते गणपती बाप्पाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यानंतर महाआरती करण्यात आली. परिसरातील भाविकांनी मनोभावे दर्शन घेत गणरायाचे स्वागत केले. यावेळी माऊली प्रतिष्ठान गणेश मंडळाचे संस्थापक गौरव गायकवाड, अध्यक्ष ओमकार देशमाने, उपाध्यक्ष अक्षय मिसाळ, नंदू दिवसे, सागर भिशे, तसेच ग्रामपंचायत सदस्य सागर फरताळे यांच्यासह गणेश मंडळाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. तसेच महिला, पुरुष व बालगोपालांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाआरतीमध्ये सहभाग घेतला. महाआरतीनंतर बालाजीनगर भजनी मंडळाच्या वतीने भक्तिमय भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. भजनाच्या सुरांनी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. भाविकांनी मोठ्या उत्साहात या कार्यक्रमाचा आनंद घेतला.

## वेतनवाढीचा प्रश्न; सोयगाव तालुक्यात शिक्षकांचा काळ्या फिती लावून निषेध



हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.१५ सप्टेंबर

गंगापूर व रत्नपूर तालुक्यातील शिक्षक बंधू-भगिनींची वेतनवाढ बंद करण्याच्या अन्यायकारक निर्णयाच्या निषेधार्थ सोयगाव तालुक्यातील शिक्षकांनी काळ्या फिती लावून निषेध व्यक्त केला.

शिक्षकांच्या वेतनवाढीबाबत घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे संबंधित शिक्षकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षकांच्या हक्कांवर गदा आणणारा व आर्थिक नुकसान करणारा हा निर्णय तातडीने मागे घेण्यात यावा, अशी मागणी सोयगाव तालुक्यातील शिक्षकांनी केली.या निषेध आंदोलनात तालुक्यातील शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत काळ्या फिती लावून शासनाच्या निर्णयाचा निषेध केला. शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांचा सकारात्मक विचार करून वेतनवाढ पूर्ववत करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

“शिक्षकांच्या हक्काची वेतनवाढ बंद करणे अन्यायकारक असून, शासनाने तातडीने हा निर्णय रद्द करून संबंधित शिक्षकांना न्याय द्यावा,” अशी भावना शिक्षकांनी व्यक्त केली.या आंदोलनातून शिक्षकांच्या एकजुटीचे दर्शन घडले असून, मागणी मान्य न झाल्यास पुढील काळात आंदोलन तीव्र करण्याचा इशारा शिक्षकांनी दिला.

## राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकनासाठी (NQAS) प्रात्यक्षिक,प्रशिक्षण आयोजन

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :**-राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन (NQAS) कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील राज्य स्तरावर पात्र ठरलेल्या १८ आरोग्य उपकेंद्रांच्या आगामी राष्ट्रीय परीक्षणाच्या तयारीसाठी विशेष प्रात्यक्षिक प्रशिक्षणाचे आयोजन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नतीषा माथुर यांच्या मार्गदर्शन व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.किशोर सुरवसे यांच्या नियंत्रणात आयोजित करण्यात आले.

सदरील प्रशिक्षण दि.१५ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हा प्रशिक्षण संघ, परभणी येथे डॉ. मनीष शर्मा (डिटीओ-अकोला) यांनी घेतले. यावेळी जिल्हा प्रशिक्षण केंद्र प्राचार्य डॉ. संतोष गुंजकर, डॉ.तपसे(NQASजिल्हा कार्यक्रमाधिकारी) यांची उपस्थिती होती.

या प्रशिक्षणास मा.डॉ. मनीष शर्मा यांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले,राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानकांनुसार उपकेंद्रांमध्ये आवश्यक असलेल्या विविध बाबी, गुणवत्ता निकष, दस्तऐवजीकरण, सेवा उपलब्धता, नोंदवही व अभिलेख, स्वच्छता, रुग्णसेवा तसेच आरोग्यसेवा अनुषंगाने करावयाच्या तयारीबाबत प्रात्यक्षिक व माहिती दिली.

सदर प्रशिक्षणासाठी तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी (MO) तसेच संबंधित उपकेंद्रांचे समुदाय आरोग्य अधिकारी (CHO), तालुका आरोग्य सहाय्यक, यांची उपस्थिती होती .

**प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील १८आरोग्य उपकेंद्रांची निवड करण्यात आली :**

सर्फराजपूर, धर्मापुरी, टाकळी कु., ब्राम्हणगाव, रामपुरी, माळसोंना, कारेगाव, पिंपळा लोखंडे, चुडावा, वडी, गुंज, खादगांव (गंगाखेड), सावळी, कुपटा, धनेगाव, देगाव, शिर्शी व पाचलेगाव. सदरील आरोग्य संस्थांनी राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकनासाठी निर्धारित निकष व निर्देशांकानुसार आरोग्य सेवा सुविधा याबद्दल स्वपरीक्षण करून कामातील गुणवत्ता वाढीवर प्रशिक्षणात मार्गदर्शन करण्यात आले. राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन परीक्षणामध्ये परभणी जिल्ह्यातील पात्र आरोग्य उपकेंद्रांची कामगिरी उत्कृष्ट राहावी तसेच राष्ट्रीय प्रमाणीकरण प्राप्त करणे आणि आरोग्य सेवा अधिक गुणवत्तापूर्ण व लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने हे प्रशिक्षण महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## गणेशोत्सव देखाव्यातून तिसरी मुंबई विरोधात जनजागृती

### सरकारच्या तिसरी मुंबई प्रकल्पाच्या विरोधात लढण्याचे केले आवाहन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** राज्य सरकारच्या तिसरी मुंबई विरोधात उरण पनवेल पेण तालुक्यातील १२४ गावातून प्रखर विरोध केला जात आहे. सरकारने भूसंपादन प्रक्रिया सुरू केल्यापासून या विरोधकाला अधिक गती मिळाली आहे. एकीकडे सरकार तिसरी मुंबईचा हट्ट कायम ठेवत आहे तर दुसरीकडे शेतकरी संघटना १२४ गाव पिंजून काढत विरोधाची धार वाढवत आहेत. आता हा विरोध गणपती देखाव्यातून पाहायला मिळत आहे. यांद्वारे तिसरी मुंबईला कोणत्याही प्रकारे जमीन न देण्याची व तरुण पिढीला या लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले जात आहे.

एमएमआरडीए केएससी नवनगर तिसरी मुंबई विरोधी शेतकरी समिती रायगड चे सरचिटणीस रूपेश पाटील यांनी गणपती देखाव्यातून शहरी आणि ग्रामीण जीवनातील फरक दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. एक शेतकरी गणपती बाप्पाला आवाहन करत असून तिसरी मुंबईतून हद्दपार झालो तर तुझे सण आणि उत्सव कसे साजरे करणार अशी आर्त विनवणी करत आहे. मुंबई नवी मुंबईत स्थानिक आगरी कोळी कराडी कुणबी



समाज भूमिहीन होऊन उध्वस्त झाला असून उपऱ्यांनी हातपाय पसरले आहेत. त्यांनी स्थानिकांचे सामाजिक व राजकीय स्थान धोक्यात आणले आहे. शहरांमुळे स्थानिक समाजसंस्कृती बोलीभाषा व्यवसाय रोजगार यावर परप्रांतीयांचे आक्रमण झाले आहे. शहरातील सिमेंटची जंगले, टॉवर संस्कृतीमुळे नागरी सुविधावर ताण पडतो. याशिवाय गुन्हेगारी फोफावली असल्याचे मुंबईत नवी मुंबईत बघायला मिळते. श्रीमंतांना मोकळा श्वास देण्यासाठी तिसरी मुंबई उभारण्याच्या सरकारी धोरणाने ग्रामीण शेतकरी उध्वस्त होणार आहे. उदरनिर्वाहाची शेती काढून त्यांचा श्वास कोंडवणारी कृती सरकारची असून मुख्यमंत्री फडणवीस आपल्या जन्मभूमी नागपूरात दुसरे नागपूर तिसरे नागपूर उभे करतील का असा प्रश्न केला जात आहे. या देखाव्यातून शेती जमीन घरे आणि गावे वाचवण्यासाठीच्या लढाईत जेन झी आणि जेन अल्फा पिढीने आपल्या भविष्य डोळ्यासमोर ठेवून उतरण्याचे आवाहन केलं आहे. तिसऱ्या मुंबई विरोधात सहभागी होण्याची सुबुद्धी गणपती बाप्पाने शेतकरी आणि युवा पिढीला द्यावी अशीही साद घालण्यात आली आहे. सेझ आंदोलनातील प्रमुख मार्गदर्शक दिवंगत माजी न्यायमूर्ती पी बी सावंत, लोकनेते दत्ता पाटील, कॉम्रेड विलास सोनावणे यांचे स्मरण करण्यात आले आहे. याशिवाय सेझ आंदोलनातील मार्गदर्शक आणि तिसरी मुंबई विरोधी लढ्याचे प्रमुख मार्गदर्शक माजी न्यायमूर्ती बी जी कोळसे पाटील यांनाही देखाव्यात स्थान दिले आहे. तिसरी मुंबई विरोधातील शेतकऱ्यांच्या लढ्याला महाराष्ट्रातील अनेक नामांकित वृत्तपत्रांनी प्रसिद्धी दिली त्या सर्व वृत्तपत्रांच्या बातम्यांची कात्रणे देखील देखाव्यात लावण्यात आली आहेत.

## नागरिकांनी स्वच्छता ही सेवा उपक्रमात सहभाग नोंदवावा : डॉ कृष्ण कांत कनवारिया

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

जालना

स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-2 अंतर्गत स्वच्छता ही सेवा 2026 पंधरवडा दि. 17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर 2026 या कालावधीत *स्वच्छते मध्ये सहभाग, स्वच्छ भारत, विकसित भारत* या थीमखाली साजरा करण्यात येत असून या अभियानात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ कृष्ण कांत कनवारिया यांनी विभाग प्रमुखांच्या बैठकीत केले. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, प्रकल्प संचालक सुशील कुमार पठारे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र तुबाकले, प्रकल्प संचालक लिंबाजी बारगीरे यांच्या सह अनेकांची उपस्थिती होती.

केंद्र व राज्य शासनाच्या सुचनेनुसार हा उपक्रम जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये राबविला

**स्वच्छता ही सेवा पंधरवडा म्हणजे केवळ मोहिम नसून हा सामूहिक कृतीचा उत्सव आहे. 17 सप्टेंबर रोजी गावागावात प्रभात फेरी व सेवा ज्योत या उपक्रमाचे आयोजन केले असून जिल्ह्यातील सर्व नागरिकांच्या सहभागातूनच जालना जिल्हा स्वच्छ, निरोगी व सुजल बनविण्याचे ध्येय साध्य होईल.**

**-डॉ कृष्ण कांत कनवारिया**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद जालना**

जात आसुन. या मोहिमेत जिल्ह्यातील सर्व नागरिक, संस्था, शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट तसेच विविध विभागांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,तसेच

या पंधरवड्या दरम्यान प्रमुख उपक्रमांतर्गत अस्वच्छ ठिकाणांची निवड करून साफसफाई करणे, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, सफाईमित्र सुरक्षा शिबिरे, पर्यावरणपूरक व शून्य कचरा उत्सव, स्वच्छ सुजल गाव संकल्पनेशी निगडित प्रबोधनपर कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच दि. 1 ऑक्टोबर 2026 रोजी “एक दिवस – एक तास – एक सोबत” या संकल्पनेतून देशव्यापी श्रमदान आयोजित करण्यात आले आहे. या दिवशी जास्तीत जास्त नागरिकांनी आपल्या गावात सामूहिक श्रमदान करून स्वच्छता मोहिमेला हातभार लावावा, तसेच जिल्हाभरात जास्तीचा पाऊस झाला असल्यामुळे गावातील नाल्या द्वारे पाणी गावात साचले असून गावातील नाल्या वाहत्या करणे तसेच पूरग्रस्तांना आवश्यक ती मदत करण्याबाबतही आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ कृष्ण कांत कनवारिया यांनी जिल्हा परिषदेत आयोजित करण्यात आलेल्या प्रमुखांच्या बैठकीत केले आहे.

## सावळदबारा परिसरातील गायरान धारक शेतकरी याचा सातबारा प्रश्न अखेर मार्गी

### लावल्याबद्दल इद्रीस मुलतानी याचा साखर तुला करून स्वागत

**सावळदबारा प्रतिनिधी :** सोयगाव तालुक्यातील सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांचा गेल्या पाच दशकांपासून प्रलंबित असलेला सातबारा उताऱ्याचा प्रश्न अखेर मार्गी लागल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या प्रश्नासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याबद्दल भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी यांचे ग्रामस्थ व शेतकऱ्यांच्या वतीने साखर तुला करून स्वागत करण्यात आले.



सावळदबारा परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनींच्या सातबारा उताऱ्याशी संबंधित प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होते. त्यामुळे कर्जप्रकरणे तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेताना शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत होता. हा प्रश्न तातडीने सोडविण्यात यावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून सातत्याने होत होती.

या प्रश्नाची दखल घेत इद्रीस मुलतानी यांनी संबंधित प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून शेतकऱ्यांचा सातबारा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. अखेर या प्रयत्नांना यश मिळाल्याने सुमारे ४०० शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

सातबारा प्रश्न मार्गी लागल्यानंतर सावळदबारा येथे इद्रीस मुलतानी यांचा ग्रामस्थ व शेतकऱ्यांच्या वतीने साखर तुला करून सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना फेटा बांधण्यात आला. त्यानंतर इद्रीस मुलतानी यांची मिरवणूक काढण्यात आली. शेतकरी व ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत आनंद व्यक्त केला. मिरवणुकीदरम्यान ग्रामस्थांनी इद्रीस मुलतानी यांचे स्वागत केले.यावेळी सभापती उत्तम चव्हाण, पं. स. सदस्य राहुल राठोड, भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते, जयप्रकाश चव्हाण, गणेश लोखंडे,माजी प्राचार्य नारायण कोलते, प्रमोद पाटील, कैलास शेळके, प्रभाकर बंडे, मनोज बुढाळ, एकनाथ सपाटे, दिनकर शिपलकर, सखाराम कोते, संजय राजपूत, देवाप्पा पंधाडे, दीपक मानकर, रामचंद चिमणकर, समाधान नरोटे, मुनाफ सय्याद, प्रल्हाद नरोटे, यांच्यासह सावळदबारा परिसरातील शेतकरी, ग्रामस्थ आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोयगावात शांततेत गणेशोत्सव; 18 गावांत ‘एक गाव, एक गणपती’

### 76 गणेश मंडळांची स्थापना; डीजेचा वापर टाळण्यास मंडळांचा सकारात्मक प्रतिसाद

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.१५ सप्टेंबर

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सोयगाव पोलीस ठाणे हद्दीत गणेश मंडळे, ग्रामस्थ आणि पोलीस प्रशासन यांच्या समन्वयातून उत्सवाला शांततामय आणि शिस्तबद्ध सुरुवात झाली आहे. एकूण ५१ गावांपैकी ३३ गावांमध्ये ७६ लहान-मोठ्या गणेश मंडळांनी गणेशमूर्तीची स्थापना केली आहे. विशेष म्हणजे, १८ गावांमध्ये ‘एक गाव, एक गणपती’ ही संकल्पना राबविण्यात आली असून, गावकऱ्यांनी एकत्रितपणे गणेशोत्सव साजरा करण्यास प्राधान्य दिले आहे.

स्थापित करण्यात आलेल्या गणेशमूर्तींपैकी ५ फूट व त्यापेक्षा जास्त उंचीच्या २७ गणेश मंडळांच्या मूर्ती, तर ५ फूटापेक्षा कमी उंचीच्या ५१ गणेश मंडळांच्या मूर्ती आहेत. गणेश मंडळांना ऑनलाइन परवानगी घेण्याबाबत प्रशासनाकडून मार्गदर्शन करण्यात आले असून, आतापर्यंत २९ गणेश मंडळांनी ऑनलाइन परवानगी घेतली आहे. उर्वरित मंडळांचीही परवानगी घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.



डीजेला फाटा; विसर्जनही शांततेत करण्याचा मंडळांचा निर्धार

गणेशोत्सवाच्या सुरुवातीपासून सोयगाव पोलीस ठाणे हद्दीत एकाही गणेश मंडळाकडून डीजेचा वापर करण्यात आलेला नाही. ध्वनी प्रदूषण टाळण्याबाबत पोलीस प्रशासनाने केलेल्या आवाहनाला मंडळांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

सोयगाव येथे एका गणेश मंडळाने बँजोचा वापर केला होता. मात्र, त्याची ध्वनी पातळी ७५ ते ८० डेसिबल इतकी ठेवण्यात आली होती. याबाबतही प्रशासनाकडून आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले आहे. त्यानंतर इतर गणेश मंडळांनीही ध्वनी प्रदूषण टाळण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली असून, विसर्जन मिरवणुकीदरम्यान डीजे तसेच बँजो न वाजविण्याचा निर्णय घेण्याकडे मंडळांचा कल आहे.

पोलीस प्रशासनाकडून सातत्याने समन्वय

गणेशोत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, सर्वसामान्य नागरिकांना उत्सवाचा आनंद सुरक्षित वातावरणात घेता यावा आणि कोणत्याही प्रकारे ध्वनी प्रदूषण अथवा अनुचित प्रकार घडू नयेत, यासाठी सोयगाव पोलीस ठाण्याकडून गणेश मंडळे, पदाधिकारी आणि ग्रामस्थांशी सातत्याने संपर्क व समन्वय ठेवण्यात येत आहे.

गणेश मंडळांनी आवश्यक परवानग्या घेणे, प्रशासनाच्या सूचनांचे पालन करणे, ध्वनी प्रदूषण टाळणे तसेच विसर्जन मिरवणुका शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्याबाबत पोलिसांकडून मार्गदर्शन करण्यात येत आहे.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांचे आवाहन

प्रकाश जाधव, पोलीस अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण यांनी गणेश मंडळे आणि नागरिकांचे शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी घेतलेल्या सकारात्मक भूमिकेचे स्वागत केले आहे. गणेशोत्सव हा श्रद्धेसोबतच सामाजिक एकोपा आणि बंधुभाव वाढविणारा उत्सव आहे. त्यामुळे उत्सव साजरा करताना कायदा व सुव्यवस्था, ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे पालन आणि इतर नागरिकांच्या हक्कांचा विचार करावा, असे त्यांनी आवाहन केले.

गणेश मंडळांनी डीजे आणि मोठ्या आवाजातील ध्वनीक्षेपकांचा वापर टाळावा, विसर्जन मिरवणुका शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडाव्यात तसेच प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे. ‘एक गाव, एक गणपती’सारख्या उपक्रमातून सामाजिक एकोपा अधिक दृढ करण्याबरोबरच पर्यावरणपूरक आणि आदर्श गणेशोत्सव साजरा करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असेही पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी सांगितले.

## ध्वजारोहण समारंभ पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी



**परभणी :** मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या 78 व्या वर्धापन दिनानिमित्त गुरुवार, दि. 17 सप्टेंबर 2026 रोजी सकाळी 9 वाजता राजगोपालचारी उद्यान, परभणी येथे राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा मुख्य समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

तत्पूर्वी त्याच ठिकाणी स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहण्यात येणार आहे. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित मुख्य कार्यक्रम समारंभाला येताना राष्ट्रीय पोषाख परिधान करून सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे.

प्रशासकीय इमारत येथे ध्वजारोहण समारंभ मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या 78व्या वर्धापन दिनानिमित्त गुरुवार, दि. 17 सप्टेंबर 2026 रोजी सकाळी 7.30 वाजता प्रशासकीय इमारत, परभणी येथे ध्वजारोहणाचा कार्यक्रम अपर जिल्हाधिकारी शोभादेवी जाधव यांच्या हस्ते पार पडणार आहे. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम समारंभाला येताना अधिकारी-कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय पोषाख परिधान करून उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## सिल्लोड तालुका दुष्काळग्रस्त घोषित करा; शेतकरी, विद्यार्थी व नागरिकांना मदत द्या



**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यात पावसाने दडी मारल्याने खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. शासनाने परिस्थितीची तातडीने पाहणी करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी पंचायत समिती सदस्य शेख सलीम यांनी केली आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टर एक लाख रुपये आर्थिक मदत द्यावी. मागील हंगामातील प्रलंबित पीक विम्याची रक्कम तातडीने मंजूर करून शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी. तसेच पिकांचे तातडीने पंचनामे करावेत, अशी मागणी त्यांनी केली.

तालुक्यातील विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन शैक्षणिक शुल्क माफ करावे. जनावरांसाठी चारा छावण्या सुरू कराव्यात, पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची व्यवस्था करावी. तसेच रोजगाराचा प्रश्न निर्माण झाल्याने मनरेगा व इतर रोजगाराची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू करावीत.

शेतकरी व नागरिकांना वीजबिल, कर्जवसुली तसेच इतर शासकीय वसुलीमध्ये आवश्यक सवलत व स्थगिती देण्यात यावी. सिल्लोड तालुका दुष्काळग्रस्त घोषित करून शासनाच्या सर्व दुष्काळी उपाययोजना तातडीने लागू कराव्यात, अशी मागणी पंचायत समिती सदस्य शेख सलीम यांनी केली आहे.

## सहा उर्दू शाळांची एसआयटी मार्फत चौकशीची मागणी

### आ. सईद खान यांचे विशेष चौकशी सचिवांना पत्र

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी



**परभणी :-** गेल्या अनेक दिवसापासून चौकशीच्या मागणीने जोर धरल्याने शरीरातील शब्बीर अन्सारी उर्दू एज्युकेशन सोसायटी संचलित पाच शाळा वखान अब्दुल गफार खान उर्दू प्राथमिक शाळेची सन 2012 पासून चौकशी करण्याची मागणी आ. सईद खान यांनी लावून धरली आहे

यासंदर्भात दिनांक 10 सप्टेंबर गुरुवाररोजी विशेष चौकी समितीचे सदस्य सचिव तथा शिक्षण सह संचालक हारून अत्तार पत्र दिले आहे

सदरील शाळांमध्ये सन 2012 पासून विविध प्रकारच्या आर्थिक व्यवहार व अनियमितता असल्याची अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या पत्रात नमूद केलेआहे यांचा संदर्भ घेऊन संबंधित शाळांना देण्यात आलेल्या मान्यता व शिक्षकांच्या नियुक्त्या व वैयक्तिक मान्यता नियुक्ती प्रस्ताव आदेश सेवा पुस्तिका तसेच शिक्षकांच्या मूळ संचिकांची तपासणी करण्याची मागणी या चौकशीत करण्यात आली आहे शासनाने शिक्षक भरतीवर निर्बंध घातलेले असतानाही या कालावधीत करण्यात आलेल्या नियुक्त्या कोणत्या नियमाच्या आधारे करण्यात आल्या? या संदर्भातील आ. सईद खान यांनी केली आहे शिक्षक हजेरीपट व वेतन देयके सेवा सातत्य सेवा जेष्ठता पद निर्मिती व पद मान्यता तसेच शासनाकडून मिळालेल्या अनुदानाच्या वापराचा अभिलेख यांचा सखोल तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे या चौकशीत दोषी आढळणाऱ्या वर नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणीआ. सईद खान यांनी केलेल्या चौकशी पत्रातून करण्यात आली आहे.

## भरती परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी सूचना व अभिप्राय द्या!

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :**-राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी परीक्षा पद्धतीत आवश्यक सुधारणा सुचविण्याचे आवाहन.

छत्रपती संभाजीनगर विभागातील विद्यार्थी, परीक्षार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस, अभ्यासिका चालक, लोकप्रतिनिधी व नागरिकांनी आपले सूचना, शिफारशी, हरकती व अभिप्राय द्यावेत. दि.१८ सप्टेंबर २०२६ सकाळी १० ते सायंकाळी ६ आठही जिल्ह्यांतील जिल्हाधिकारी कार्यालयांत विशेष कक्ष २१ सप्टेंबर २०२६ | सकाळी १०.३० वाजता छत्रपती संभाजीनगर येथील स्मार्ट सिटी कार्यालयात उच्चस्तरीय समिती नागरिक व संबंधित घटकांशी थेट चर्चा करणार. प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नसल्यास लेखी अभिप्राय या ई-मेलवर पाठवा- csn-examreformstask-force@maharashtra.gov.in

## मुकुल हरीश पुष्पा इम्पॉसिबल मध्ये

सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल हा शो सतत बदलणाऱ्या नात्यांमुळे आणि अनपेक्षित ट्विस्टमुळे प्रेक्षकांना गुंतवून ठेवत आहे. पुष्पा (करुणा पांडे) यांच्या जगात एक नवा पैलू जोडत आहेत अभिनेता मुकुल हरीश, ज्यांनी शोमध्ये टायगर ही भूमिका साकारली आहे. टायगर हा एक स्वावलंबी, सावध आणि कठीण भूतकाळ असलेला व्यक्तिरेखा आहे, ज्यामुळे कथानकात नवी रोचकता निर्माण झाली आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालणाऱ्या फॉरेन्सिक मेडिसीन गॅलरीचे लोकार्पण

## घाटीत अत्याधुनिक शवगृहाची सुविधा; दररोज 10 ते 12 मृतदेहांचे शवविच्छेदन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी




**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील न्यायवैद्यकशास्त्र विभागात विद्यार्थ्यांना न्यायवैद्यकशास्त्राचे प्रत्यक्ष व सखोल ज्ञान मिळावे, यासाठी उभारण्यात आलेल्या फॉरेन्सिक मेडिसीन गॅलरीचे लोकार्पण अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते करण्यात आले. या गॅलरीचा एमबीबीएस, एमडी, नर्सिंग तसेच आंतरवासिता विद्यार्थ्यांसह पोलिसांनाही उपयोग होणार आहे.

गॅलरीमध्ये न्यायवैद्यकशास्त्राशी संबंधित विविध बाबींची माहिती उपलब्ध करून देण्यात आली असून, विद्यार्थ्यांना विषयाचे ज्ञान अधिक प्रभावीपणे समजून घेण्यास मदत होणार आहे. यावेळी न्यायवैद्यकशास्त्र विभागप्रमुख डॉ. राधेय खेत्रे यांनी विभागाच्या वतीने सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश हरबडे, डॉ. धम्मपाल म्हस्के, डॉ. निशांत खरात, डॉ. राजेश्वरी, सय्यद तारेख अहमद, सपकाळ, सतीश वाघ, अजीम शेख, सई अयाज शेख, अरबाज शेख, रहमान खान, विजय घाटे, अखिल शेख, सुरेश निदांने, शेख सय्यद आदी उपस्थित होते.

अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे म्हणाले की, न्यायवैद्यकशास्त्र विभागाचे काम २४ तास सुरू असते. घाटीतील शवचिकित्सागृहावर राज्यभरातील पोलिसांसह न्यायालयांचा विश्वास वाढला आहे. एखाद्या व्यक्तीचा अपघात, आजार किंवा अन्य कारणाने मृत्यू झाल्यानंतर मृत्यूचे अचूक कारण समोर येणे हे नातेवाइकांसाठी महत्त्वाचे असते. घाटी प्रशासनाने शवचिकित्सागृहाच्या सुविधांमध्ये मोठी सुधारणा केली असून, मराठवाड्यातील पहिले सुसज्ज व अत्याधुनिक पद्धतीचे शवगृह (कोल्ड स्टोरेज) तयार करण्यात आले आहे. सध्या जवळपास तीन शवचिकित्सागृहांची सुविधा उपलब्ध असून, दररोज साधारणतः १० ते १२ मृतदेहांचे शवविच्छेदन केले जाते.

खासगी रुग्णालयात मृत्यू झालेल्या व्यक्तीचा मृतदेहही घाटी प्रशासन आणि पोलिसांच्या परवानगीने घाटीत ठेवता येतो. यासाठी मोफत मृतदेह ठेवण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# घाटीत वैद्यकीय शिक्षणासाठी दोन देहदान

## देहदानाला प्रतिसाद; वर्षभरात 18, तर 2023 पासून 98 देह प्राप्त

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** मृत्यूनंतरही आपला देह वैद्यकीय शिक्षणासाठी समर्पित करून समाजसेवेचे कार्य सुरू ठेवण्याची प्रेरणादायी भावना जपत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील शरीररचनाशास्त्र विभागाला नुकतेच दोन देहदान प्राप्त झाले. यामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील शिवशंकर कॉलनीतील स्व. धोंडीराम सहादू वेताळ (८५) आणि वैजापूर तालुक्यातील वाकला येथील स्व. सुभाष राधाजी निकम (७५) यांचा समावेश आहे.

अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शरीररचनाशास्त्र विभागप्रमुख डॉ. अर्चना कल्याणकर-तुंगेनवार यांच्या पुढाकाराने देहदानाच्या या मानवतावादी चळवळीला सातत्याने बळ मिळत आहे. चालू वर्षात आतापर्यंत विभागाला सुमारे १८ देहदान प्राप्त झाले असून, २०२३ पासून आतापर्यंत साधारण ९८ देहदान झाले आहेत.

वैजापूरसारख्या ग्रामीण भागातून स्व. सुभाष निकम यांचा देह वैद्यकीय शिक्षणासाठी स्वेच्छेने समर्पित करण्यात आला. ग्रामीण भागातही देहदानाबाबत सकारात्मक जागरूकता वाढत असल्याचे यावरून दिसून येते. हे देहदान जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज संस्थान यांच्या सहकार्याने प्राप्त झाले. शरीररचनाशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. पल्लवी चव्हाण आणि डॉ. वैशाली किरवले यांच्या माध्यमातून देहदानाची आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

# इंदिराबाई पाठक महिला महाविद्यालयात NCMC कार्ड नोंदणी शिबिर

## रोटरी क्लब ऑफ संभाजीनगर एलीटचा उपक्रम; 50 विद्यार्थिनींचा सहभाग

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** रोटरी क्लब ऑफ संभाजीनगर एलीटच्या वतीने इंदिराबाई पाठक महिला महाविद्यालयात नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (NCMC) अर्थात 'एक देश, एक कार्ड' योजनेबाबत जनजागृती व नोंदणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात ५० विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्डसाठी नोंदणी केली.

शिबिरात विद्यार्थिनींना NCMC कार्डची नोंदणी प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे तसेच कार्डच्या विविध सुविधांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. एस.टी. प्रवासासह विविध सार्वजनिक वाहतूक सेवांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या या कार्डमुळे प्रवाशांचा प्रवास अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे. 'एक कार्ड, अनेक सेवा' या संकल्पनेची माहितीही यावेळी देण्यात आली.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकल्पप्रमुख डॉ. सुनीता वाजपेयी आणि रोटेरियन स्वाती स्मार्त यांनी विशेष परिश्रम घेतले. रोटरी क्लब ऑफ संभाजीनगर एलीटचे पदाधिकारी व सदस्य तसेच इंदिराबाई पाठक महिला महाविद्यालयाच्या सहकार्याने शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.

# एमजीएममध्ये आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त जनजागृती

## रॅली, पोस्टर प्रदर्शन, पथनाट्य, फ्लॅश मॉबमधून मानसिक आरोग्याचा संदेश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसच्या मानसशास्त्र विभागातर्फे जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन विविध जनजागृतीपर व सर्जनशील उपक्रमांनी साजरा करण्यात आला. 'क्रिएटिंग होप थ्रू ॲक्शन' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमातून मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासोबतच आत्महत्येविषयी खुले व संवेदनशील संवाद घडवून आणण्याचा संदेश देण्यात आला.

चिंतनगाह येथे आयोजित कार्यक्रमास केंद्रीय लोकसेवा आयोगाचे सचिव शशी रंजन कुमार, सहसचिव संतोष अजमेरा, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, संचालक डॉ. रमेश जरे, डॉ. मानसी करजगावकर यांच्यासह विविध अधिष्ठाता, संचालक, विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी व मान्यवर उपस्थित होते.

विद्यापीठ परिसरात जनजागृती रॅली काढण्यात आली. त्यानंतर विविध जनजागृतीपर स्टॉल्स, मानसशास्त्रीय मूल्यांकन केंद्रे आणि पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी कविता, शायरी, कथाकथन, भाषणे, गायन, पथनाट्य, नृत्य आणि फ्लॅश मॉबच्या माध्यमातून आशा, मानसिक लवचिकता, संवाद, सहानुभूती आणि गरजू व्यक्तींना मदत करण्याचा संदेश दिला.आत्महत्या प्रतिबंध हा केवळ संकटाच्या काळात हस्तक्षेप करण्यापुरता मर्यादित नसून व्यक्तींमधील परस्पर संबंध दृढ करणे, मानसिक आरोग्याविषयीचे गैरसमज व कलंक दूर करणे, भावनिक तणावाची लक्षणे वेळीच ओळखणे आणि भावना व्यक्त करण्यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्याशी संबंधित आपले विचार, भावना, अनुभव व दृष्टिकोन खुलेपणाने मांडले. व्यक्तीला भावना व्यक्त करण्यासाठी सुरक्षित जागा, समाजाशी जोडलेपणाची भावना आणि मदत मागण्यासाठी आवश्यक आधार मिळाल्यास आशेचे रूपांतर कृतीत होऊ शकते, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# जिंतूर तालुक्यातील शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्या

## भारतीय किसान संघाचे मुख्यमंत्र्यांना निवेदन; सरसकट 50 हजार रुपये प्रति हेक्टर मदतीची मागणी




**जिंतूर, दि. १५ सप्टेंबर :** जिंतूर तालुक्यात यंदा पावसाने ओढ दिल्यामुळे खरीप हंगामातील पिके मोठ्या प्रमाणावर सुकून गेली असून शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी, तसेच विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत, या मागण्यांसाठी भारतीय किसान संघ, महाराष्ट्र यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तहसीलदार, जिंतूर यांच्यामार्फत मंगळवारी निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, नैसर्गिक परिस्थिती आणि अल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या दुष्काळसदृश वातावरणाचा मोठा फटका तालुक्यातील शेतकऱ्यांना बसला आहे. पावसाअभावी खरीप हंगामातील पिके करपली असून अनेक ठिकाणी उभी पिके सुकून गेली आहेत. परिणामी शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून रब्बी हंगामाबाबतही अनिश्चितता निर्माण झाली आहे.

या परिस्थितीत जिंतूर तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना कोणत्याही पंचनाम्याची अट न घालता सरसकट किमान ५० हजार रुपये प्रति हेक्टर आर्थिक मदत देण्यात यावी, अशी प्रमुख मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. यासोबतच आगामी रब्बी हंगामासाठी खते व बियाणे विनाशुल्क उपलब्ध करून द्यावीत तसेच पशुधनासाठी पुरेशा प्रमाणात चाऱ्याची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली.

शासनाकडून ई-पिक पाहणीची प्रक्रिया राबविली जात असली तरी प्रत्यक्षात अनेक अडचणी येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना स्वतः ई-पिक पाहणी करण्याची परवानगी द्यावी. तसेच मागील वर्षाचा प्रलंबित पीक विमा त्वरित वितरित करावा, अशी मागणीही करण्यात आली.

कर्जमाफीच्या योजनेत अद्यापही अनेक शेतकरी वंचित असल्याचा आरोप करत, पात्र सर्व शेतकऱ्यांचा समावेश करून शंभर टक्के कर्जमाफीचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. कर्जमाफीबाबत काही बँकांकडून घेतली जाणारी विरोधी भूमिका दूर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदन सादर करताना भारतीय किसान संघाचे पद्मश्री दादा लाड, तालुकाध्यक्ष नवनाथ जगताप, तालुका उपाध्यक्ष मोहन आडे, तालुका मंत्री विठ्ठल थिटे, जिल्हा कोषाध्यक्ष बळवंत कौसडीकर यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. यामध्ये अमृत इटोलिकर, अभिजीत कौसडीकर, गणेश खवणे, ओंकार वर्मा, मोहिते महाराज, जगताप पुंगळेकर, थिटे, काचगुंडे, मोरे भोगावकर, देशमुख आदींचा समावेश होता.

# गरजू गर्भवती महिलांना पोषण पूरक आहाराचे वाटप

## एचजी फाउंडेशन आणि संवेदना डेव्हलपमेंट सोसायटीचा संयुक्त उपक्रम

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर (लासुरगाव) :** एचजी फाउंडेशन आणि संवेदना डेव्हलपमेंट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या सीएसआर उपक्रमांतर्गत लासुरगाव येथे शारीरिकदृष्ट्या अशक्त व पोषणदृष्ट्या गरजू गर्भवती महिलांना पोषण पूरक आहाराचे वाटप करण्यात आले.

गर्भावस्थेतील महिलांच्या पोषणाच्या गरजा पूर्ण करून मातृ व बाल आरोग्य सुधारण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. याअंतर्गत पात्र गर्भवती महिलांना पोषण पूरक आहार देण्यात आला. गर्भावस्थेदरम्यान योग्य व पुरेसा आहार मिळाल्यास मातांचे आरोग्य सुधारण्यासोबतच गर्भातील बाळाच्या वाढीसाठीही त्याचा सकारात्मक परिणाम होतो.

यावेळी प्रोग्राम मॅनेजर हरिश लालकोट, प्रोग्राम कॉर्डिनेटर सचिन लिमकर, व्हिलेज कोऑर्डिनेटर सौ. पल्लवी सेजुळ, अंगणवाडी कार्यकर्त्या, संस्थेचे टीम सदस्य तसेच समुदाय प्रतिनिधी उपस्थित होते. ग्रामीण भागातील गर्भवती महिलांमध्ये मातृ पोषणाबाबत जनजागृती करणे, निरोगी गर्भधारणेला प्रोत्साहन देणे आणि गरजू महिलांना आवश्यक पोषणात्मक आधार उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील गरजू महिलांना पोषणाचा आधार मिळत असून, मातृ व बाल आरोग्य सुधारण्यास मदत होत आहे.

# मुस्लिमांनी केली अल्ला कडे पावसासाठी नमाज-ए-इस्तिस्का

**जिंतूर :** प्रतिनिधी



तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुस्लिम समाजबांधवांनी मंगळवारी शमशोद्दीन इदगाह येथे विशेष नमाज-ए-इस्तिस्का अदा करून पावसासाठी अल्लाहच्या दरबारात आर्त प्रार्थना केली. करपणारी पिके, पाण्यासाठी व्याकूळ झालेले पशुधन आणि पावसाच्या प्रतीक्षेत असलेले शेतकरी यांचे दुःख मनात ठेवून समाजबांधवांनी भरपूर व समाधानकारक पावसासाठी दुवा मागितली.

मौलाना तजमुल अहमद खान यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज अदा करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी हात आकाशाकडे उंचावत परिसरावर अल्लाहची रहमत बरसावी, शेतशिवार हिरवेगार व्हावे व जनावरांची तहान भागावी, अशी प्रार्थना केली. विशेष म्हणजे या प्रार्थनेत काही नागरिकांनी जनावरांनाही सोबत आणल्याने कार्यक्रमाला भावनिक स्वरूप प्राप्त झाले.

मुफ्ती कलीम बेग यांनी समाजात प्रामाणिकपणा, परस्पर व्यवहारांची पूर्तता आणि गरजूंना मदत करण्याचे आवाहन केले. तसेच बुधवारी सकाळी १० वाजता साखरतळा रस्त्यावर पावसासाठी सामूहिक नमाज आयोजित करण्यात आल्याची माहिती देत मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले. यावेळी मौलाना अ. जलील मिल्ली, मिर्झा जाकेर बेग यांच्यासह धर्मगुरू, शेतकरी व समाजबांधव उपस्थित होते.

# अखेर सफाई कामगारांच्या हक्काच्या घरांचा मार्ग सुकर

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेतून 32 सदनिकांचे सोडत पद्धतीने वाटप!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर




शहरातील वर्षानुवर्षे घाणीशी दोन हात करून अहोरात्र स्वच्छता करणाऱ्या सफाई कामगारांच्या आयुष्यात अखेर आनंदाचा सूर्य उगवला आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या घनकचरा विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजने'अंतर्गत सफाई कामगारांसाठी बांधण्यात आलेल्या ३२ सदनिकांच्या वाटपाची बहुप्रतिक्षित सोडत प्रक्रिया आज महापौर समीर राजूरकर आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात आणि पारदर्शक वातावरणात संपन्न झाली.

महापालिकेच्या सेवेत २५ वर्षे किंवा त्याहून अधिक काळ प्रामाणिकपणे सेवा बजावलेल्या, तसेच सेवेत असताना किंवा सेवानिवृत्तीनंतर दुर्दैवाने मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसांना मालकी हक्काने मोफत सदनिका देण्याच्या शासनाच्या धोरणाला आता प्रत्यक्षात स्वरूप आले आहे. हर्सूल येथील गट क्रमांक २६६ मधील जागेवर उभारण्यात आलेल्या दोन देखण्या इमारतींमधील ३२ सदनिकांचे भाग्य आज सोडत पद्धतीने उघडले आहे. प्रत्येक इमारतीत चार मजले असून, प्रत्येक मजल्यावर चार याप्रमाणे १ बीएचके स्वरूपाच्या आणि साधारणतः ३० चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळ असलेल्या या सदनिका लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य आणणाऱ्या ठरल्या आहेत.

या महत्त्वपूर्ण आणि संवेदनशील सोहळ्याला प्रशासकीय आणि राजकीय पातळीवरील दिग्गज मंडळी उपस्थित होती. उपमहापौर राजेंद्र जंजाळ, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, सभागृह नेते गोविंद केंद्रे, विरोधी पक्षनेते अब्दुल समीर साजिद, गलिच्छ वस्ती सुधार समिती सभापती जालिंदर शेंडगे, गटनेते हाजी शेरखान, नगरसेवक बालाजी मुंडे, फिरोज खान यांच्यासह मनपा आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, उपायुक्त अपर्णा थेटे आणि विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी यावेळी आवर्जून उपस्थित होते.

# श्री कल्याण मंदिर महामंडल विधानाचा भव्य आणि मंगलमय समारोप

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** श्री पार्श्वनाथ मंदिर आणि खंडेलवाल दिगंबर जैन पंचायतीच्या वतीने आयोजित चौव्वेचाळीस दिवसीय श्री कल्याण मंदिर महामंडल विधानाची भव्य सांगता रविवारी (१३ सप्टेंबर) आचार्य श्री विनम्रसागरजी महामुनिराज यांच्या पावन सान्निध्यात अत्यंत भक्तिभावाने आणि हजारो भाविकांच्या उपस्थितीत पार पडली. नवाबपुरा येथील श्री हीराकाका प्रांगणातील आचार्य श्री गुप्तिनंदीजी सभागृहात झालेल्या या सोहळ्यामुळे ४४ दिवसांच्या अखंड धर्माराधने, भक्ती, तपस्या आणि पुण्यार्जनाला मंगल पूर्णाहुती मिळाली.

समारोपाच्या दिवशी पहाटेपासूनच सभागृहात भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. भगवान आदिनाथ व जैन तीर्थंकरांचा अभिषेक, बृहत् शांतिधारा आणि सहस्रनाम जप उत्साहात पार पडले. तसेच श्री कल्याण मंदिर महामंडल विधान, कालसर्प विधान आणि होम-हवन आदी धार्मिक विधी विधिवत संपन्न झाले. यावेळी आचार्य श्री विनम्रसागरजींनी आपल्या मंगल प्रवचनातून मार्गदर्शन करताना सांगितले की, विधान म्हणजे केवळ पूजाविधी नसून आत्मशुद्धी, संयम, श्रद्धा आणि त्यागाची साधना आहे. अनेक कुटुंबांनी एकत्र येऊन केलेली ही आराधना समाजाच्या धार्मिक एकतेचे दर्शन घडविणारी आहे. समारोपानिमित्त सायंकाळी १०८ दीपकांनी भव्य महाआरती करण्यात आली, ज्यामध्ये पुरुष पांढऱ्या वस्त्रात तर महिला केशरी साड्या परिधान करून मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

या ऐतिहासिक सोहळ्यात पाच दीक्षार्थी बंधूंची गोदभराई करून त्यांच्या दीक्षेसाठी अनुमोदन व्यक्त करण्यात आले. यात ब्रह्मचारी प्रसन्न पाटनी (संभाजीनगर गौरव), ब्रह्मचारी अंकित भैय्या (राजस्थान), ब्रह्मचारी अनिकेत भैय्या (मुंबई), ब्रह्मचारी यश भैय्या (बीड) आणि ब्रह्मचारी वकील चंद्रजी (बडोत) यांचा समावेश होता. खंडेलवाल दिगंबर जैन पंचायतीच्या वतीने व उपस्थितांनी या तपस्वी दीक्षार्थी बंधूंचा सत्कार केला.

# वनामकृवित 17 सप्टेंबरला 'रब्बी पीक परिसंवाद व कृषी प्रदर्शन'

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :**-मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीच्या विस्तार शिक्षण संचालनालय, कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने 'रब्बी पीक परिसंवाद व कृषी प्रदर्शन' आयोजित करण्यात आले आहे. हा कार्यक्रम गुरुवार, दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठातील कृषि महाविद्यालयाच्या सभागृहात येथे होणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे वित्त, नियोजन, कृषि, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री मा. ना. ॲड. श्री. आशिष जयस्वाल यांच्या हस्ते होणार आहे. राज्याच्या सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा आणि स्वच्छता, ऊर्जा, महिला आणि बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा पालकमंत्री (परभणी जिल्हा) मा. ना. श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, परभणी महानगरपालिकेचे महापौर मा. श्री. सय्यद इकबाल सय्यद खाजा आणि जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा श्रीमती लता विजयकुमार वाकळे या विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनामकृविचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि राहणार आहेत.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून राज्यसभा सदस्य मा. खा. अशोक चव्हाण, राज्यसभा सदस्य मा. खा. डॉ. अजित गोपछडे, राज्यसभा सदस्य मा. खा.श्री रामाराव वडकुते, लोकसभा सदस्य मा. खा. आदी उपस्थित राहणार आहेत.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911